# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

**परिपत्रक**

क्रमांक:२/एनजीसी/परिपत्रक-४/२०१८/१४९४

दिनांक : 12 NOV 2018

विषय : राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील विद्यार्थी, शिक्षक व संबंधितांकरीता संस्थांमध्ये ऑनलाईन तक्रार निवारण कार्यप्रणाली उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे परिपत्रक क्र.1-101/DPG/AICTE/Regulation/2017 dt.20th Feb 2017

भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या निर्देशानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भाधीन परिपत्रकान्वये परिषदेच्या मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांनी विद्यार्थी, शिक्षक व संबंधितांकरीता संस्थांमध्ये ऑनलाईन तक्रार निवारण कार्यप्रणाली उपलब्ध करून देणेबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. तसेच शै.व.२०१८-१९ करीताच्या ॲप्रुवल प्रोसेस हॅन्डबुक मध्ये APPENDIX 6 (27)(Annexure12) मध्येही याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भाधीन परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांनुसार महाराष्ट्र राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील ज्या संस्थांनी विद्यार्थी-शिक्षक व संबंधितांकरीता संस्थांमध्ये ऑनलाईन तक्रार निवारण कार्यप्रणाली उपलब्ध करून दिलेली नाही, अशा शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना सुचित करण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निर्देशानुसार या संस्थांनी संस्थेच्या संकेतस्थळावर विद्यार्थी, शिक्षक व संबंधितांकरीता ऑनलाईन तक्रार निवारण कार्यप्रणाली उपलब्ध करून देणेबाबत त्वरीत कार्यवाही करावी. सदर बाब संबंधितांना अवगत होण्याकरीता संस्थेच्या प्रसिध्दीफलकावर / दर्शनीय ठिकाणी कायमस्वरुपी प्रसिध्द करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्या संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास सादर करण्यात यावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति : प्राचार्य/ संचालक, संचालनालयाच्या अधिनस्त सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था.

प्रत :

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीकरीता सादर.
२. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संबंधित संस्थांच्या निदर्शनास आणुन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देशित करण्यात यावे. परिपत्रकानुसार सर्व संस्थांनी अंमलबजावणी केल्याबाबतचा एकत्रित अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.
३. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २अ, १०, १६ यांना माहितीकरीता.
४. कार्यासन क्र.३ यांना माहिती व संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.